डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे

(महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था)
मुख्यालय : २८ क्वीन्स गार्डन, कॅम्प, पुणे - ४११००१

दूरध्वनी क्र. ०२०-२६३४३६०० / २६३३३३३० /२६३३३३३९ Website:- www.barti.in E-mail: - dg@barti.in

जा. क्र/बार्टी-पुणे/BANRF-२०२२/२०२४-२५ /१५२८

दिनांक २५/१०/२०२४

## परिपत्रक

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती (BANRF)-२०२२ निवड यादी

डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती (BANRF)-२०२२ अंतर्गत शासन निर्णय क्र. सान्यावि-२०२४/प्र.क्र.७७ दिनांक १० सप्टेंबर २०२४ अन्वये डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे यांच्या मार्फत देण्यात येणाऱ्या अधिछात्रवृत्ती योजनेतील सन २०२२ च्या ७६३ विद्यार्थ्यांची जाहिरातीनुसार आलेल्या अर्जांमधील कागदपत्रांची पडताळणी करून व शपथपत्र घेऊन पात्र विद्यार्थ्यांना नोंदणी दिनांकापासून १०० टक्के अधिछात्रवृत्तीचा लाभ देण्यास मान्यता देण्यात आली आहे. दिनांक १२/०९/२०२४ ते दिनांक २७/१०/२०२४ या कालावधीत एकूण ७६३ संशोधक विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कागदपत्रे पडताळणी (Original Document Verification) करिता बोलविण्यात आले होते. तसेच दि. ०७/१०/२०२४ जे विद्यार्थी उपरोक्त नमूद दिनांकाला उपस्थित नव्हते त्यांना मूळकागदपत्र पडताळणी करिता बोलविण्यात आले होते.

सदर शासन निर्णयानुसार BANRF-२०२२ अंतर्गत पात्र विद्यार्थ्यांना त्यांच्या नोंदणी दिनांकापासून UGC नियमानुसार अधिछात्रवृतीचा लाभ देण्यात येईल तसेच ज्या विद्यार्थ्यांनी यापूर्वी एम.फिल करिता BANRF अंतर्गत लाभ घेतला असेल अशा विद्यार्थ्यांना UGC च्या नियमानुसार पीएच.डी साठी पुढे तीनच वर्षाकरिता अधिछात्रवृत्तीचा लाभ देण्यात येईल. BANRF-२०२२ अंतर्गत पात्र विद्यार्थ्यांना त्यांचे अवार्ड लेटर तसेच बार्टी, कार्यालयाकडे सादर करण्याबाबत प्रपत्र (प्रगती अहवाल, घरभाडे भत्ता) त्यांच्या वैयक्तिक ईमेल आयडीवर पाठविण्यात येईल याची सर्व विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

अधिछात्रवृत्ती बाबत मूळ कागदपत्र विभागास प्राप्त झाल्यानंतर ज्यांचे सर्व कागदपत्र परिपूर्ण आहेत अशा विद्यार्थ्यांना अधिछात्रवृत्ती रक्कम त्यांच्या SBI बँक खात्यावर DBT मार्फत अदा करण्यात येईल याची सर्व विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी. सदर यादी बाबत काही आक्षेप असल्यास या कार्यालयाच्या bartifellowship2023@gmail.com या ईमेल आयडीवर पुराव्यासहित सादर करावे.

-स्वाक्षरीत-
महासंचालक
डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व
प्रशिक्षण संस्था, बार्टी, पुणे